**प्रेसनोट** दि. २१/०१/२०२३

**सिटी सर्व्हे कार्यालय, खडकमाळ येथील कंत्राटी काम करणा-या महिला कर्मचा-यावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३९/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ अ. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३१ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | खाजगी व्यक्ती - लक्ष्मी लावरे (कंत्राटी पद्धतीने काम करणारे) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | प्रथम १०,००० रू. व तडजोडी अंती ६,०००/- (सहा हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ०६/१२/२०२२
गुन्हा दाखल दिनांक :- २१/०१/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी त्यांचे मालमत्तेची (घर व जागा) वारसनोंद घेण्यासाठी हवेली सिटी सर्व्हे कार्यालया अंतर्गत खडकमाळ कार्यालयातील परिरक्षण भुमापक यांना भेटुन कागदपत्रांची पुर्तता केली होती. त्यानंतर त्या कार्यालयातील कंत्राटी काम करणा-या महिला कर्मचारी श्रीमती लक्ष्मी लावरे यांनी ती नोंद घेण्यासाठी त्यांच्यासाठी व परिरक्षण भुमापक यांच्यासाठी १०,०००/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे मालमत्तेच्या वारस नोंदीसाठी श्रीमती लक्ष्मी लावरे यांनी तडजोडीअंती त्यांच्या स्वतःसाठी व परिरक्षण भुमापक यांचेसाठी ६,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणून वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक प्रणेता सांगोलकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
7. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.

Scanned with CamScanner